MHAH190008282024

दाखल दिनांक - २५/०६/२०२४
नोंदणी दिनांक - २५/०६/२०२४
निकाल दिनांक - ०४/०८/२०२६
कालावधी - १०दिवस ०१महिने २वर्ष

शेवगाव येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयात, ता. शेवगाव, जि.अहमदनगर
(पिठासीन अधिकारी आर. आर. भद्रे)

| **नि.फौ. खटला क्र. १३०/२०२४** | **निशाणी क्र. ३३** |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक I ३२०/२०२४ शेवगाव पोलीस ठाणे | |
| अभियोगपक्ष | महाराष्ट्र शासन तर्फे<br>शेवगाव पोलीस ठाणे, ता. शेवगाव,<br>जि.अहमदनगर |
| अभियोगपक्षातर्फे सरकारी वकिल | श्री. एस. व्ही. कापडणीस |
| आरोपी | संदिप हौसीराम राउत, वय ३५ वर्षे,<br>रा. एरंडगाव, ता. शेवगाव, जि. अहमदनगर |
| आरोपीतर्फे विधीज्ञ | श्री. ए. एल. वेलदे |

**भाग ब**
(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण (iv) मधील परिच्छेद क्र ४४ (ii) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | - | ०७/०४/२०२४ |
| फिर्याद दाखल दिनांक | - | ०७/०४/२०२४ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | - | २५/०६/२०२४ |
| दोषारोप निश्चीत केल्याचा दिनांक | - | ०३/०२/२०२५ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | - | ०४/०८/२०२६ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | - | -- |
| न्यायनिर्णय दिनांक | - | ०४/०८/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | - | निरंक, आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात आले. |

**आरोपींची माहिती**

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं. ४२८ अन्वये (set off) चा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | संदिप हौसीराम राउत | -- | समजपत्र दिले | भा.द.वि. ३५४, ५०६ | निर्दोष मुक्त | नाही | नाही. |

## भाग - क
## अभियोग पक्ष /बचाव पक्ष / न्यायालयीन साक्षीदाराची यादी

**अ. अभियोग पक्षाचे साक्षीदार :**

| सा. क्र. | साक्षीदारांचे नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | पीडीता | साक्षीदार |

**ब. बचाव पक्षाचे साक्षीदार (असेल तर) :**

| अ. क्र. | साक्षीदारांची नावे | निशाणी क्र. |
|---|---|---|
| -- | -- | -- |

**क. न्यायालयाचे साक्षीदार, (असेल तर) :**

| अ. क्र. | साक्षीदारांची नावे | निशाणी क्र. |
|---|---|---|
| -- | -- | -- |

## भाग - ड
## अभियोग पक्ष /बचाव पक्ष / न्यायालयीन निशाणी क्रमांकाची यादी

**अ. अभियोग पक्ष:**

| अ. क्र. | तपशील | निशाणी क्र. |
|---|---|---|
| १ | फिर्यादवरील सही | ३० |

**ब. बचाव पक्ष :**

| अ. क्र. | तपशील | निशाणी क्र. |
|---|---|---|
| --- | --- | --- |

**क. <u>न्यायालयीन निशाणी क्रमांक</u>:-**

| अ. क्र. | तपशील | निशाणी क्र. |
|---|---|---|
| १. | घटनास्थळ पंचनामा बचावपक्षाने मान्य केला | ३१ |

**ड. <u>मुद्देमाल वस्तू</u>:**

| अ. क्र. | तपशील | निशाणी क्र. |
|---|---|---|
| १. | -- | .. |

**<u>न्यायनिर्णय</u>**

(दि. ०४/०८/२०२६ रोजी घोषित)

आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान कलम ३५४ व ५०६ अन्वये संपरिक्षा चालवण्यात आली.

अभियोगपक्षाची हकिकत थोडक्यात खालीलप्रमाणे -

२. फिर्यादी यांनी शेवगाव पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिली की, दि. ०७/०४/२०२४ रोजी सायंकाळी ४.३० वा. ती तिचया घराचे ओटयावर बसलेली असताना तेथे गावातील जवळ राहणारा संदिप हौसीराम राउत हा आला व तिला म्हणाला की मला पाणी दे. तेव्हा फिर्यादी त्यास पाणी देण्यासाठी जात असताना तो तिच्या पाठीमागून आला व तिचे हातास धरुन तिला लज्ज्रा उत्पन्न होईल असे कृत्य करु लागला व तिला म्हणाला की तू मला आवडतेस असे म्हणू लागला. त्यावेळी फिर्यादी मोठमोठयाने रडू लागली. लोक जमा होतील या भितीने आरोपी तेथून निघून जाउ लागला व जाताना म्हणाला की तू आता वाचलीस तू मला पुन्हा जर एकटी भेटलीस तर तुला सोडणाार नाही अशी धमकी दिली व निघून गेला. म्हणून सदर फिर्याद देण्यात आली.

३. सदरील फिर्यादीवरुन शेवगाव पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्र. ३२०/२०२४ भारतीय दंड संहिता कलम ३५४ व ५०६ अन्वये दाखल करणेत आला व तपास तपासी अंमलदार यांचेकडे देण्यात आला. तपसादरम्यान त्यांनी घटनास्थळ पंचनामा तयार केला, साक्षीदारांचे जबाब नोंदवले व तपासाअंती आरोपी विरोधात सबळ पुरावा आल्याने त्याच्या विरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

४. माझे पूर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपीविरुध्द नि.क्र.८ वर भारतीय दंड संहिता कलम ३५४ व ५०६ अन्वये दोषारोप निश्चीत करुन आरोपीला वाचून दाखवला. आरोपीने दोषारोपातील सर्व आरोप नाकबूल केले व खटल्यास सामोरे जाण्याची तयारी दर्शवली.

५. सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचा युक्तीवाद, आरोपींच्या वकिलांचा युक्तिवाद व कागदोपत्री पुराव्यावरुन न्यायनिर्णय देताना खालील मुद्दे उपस्थित होत असून त्यावरील निष्कर्ष कारणांसहित नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अभियोगपक्ष हे शाबित करतो काय की दि. ०७/०४/२०२४ रोजी सायंकाळी ४.३० वा. एरंडगाव गावात, ता. शेवगाव फिर्यादीच्या घराजवळ आरोपीने पाठीमागून येउन फिर्यादीचा हात धरला, तू मला आवडतेस असे म्हणून तिला लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केले व त्यायोगे भा.द.वि कलम ३५४ अन्वये गुन्हा केला ? | .. नाही |
| २ | अभियोगपक्ष हे शाबित करतो काय की वर नमूद कालावधीमध्ये व ठिकाणी आरोपीने फिर्यादीला धमकी देउन फौजदारी धाकटपशा केला व त्यायोगे भा.द.वि. कलम ५०६ अन्वये गुन्हा केला ? | .. नाही |
| ३ | आदेश काय ? | आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात आले. |

६. आरोपी विरुध्द अपराधात्मक पुरावा न आल्याने आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये निवेदन नोंदवण्यात आले नाही.

७. सकाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एस. व्ही. कापडणीस व आरोपीचे वकिल श्री. ए. एल. वेलदे यांचा युक्तीवाद ऐकला.

८. आरोपीविरुध्द गुन्हा शाबीत करण्याच्या उद्देशाने अभियोगपक्षातर्फे तोंडी व कागदोपत्री पुरावा सादर करण्यात आला. आरोपी व फिर्यादी यांनी आपसात तडजोड झाल्यामूळे तडजोड करणेबाबत अर्ज नि. २७ दिला. परंतु सदर प्रकरणातील कलम तडजोडपात्र नसल्याने अर्ज नामंजूर करण्यात आला.

## <u>कारणमिमांसा</u>

### <u>मुद्दा क्र १ व २ करिता</u> -

९. खटल्यातील सर्व मुद्दयांवरील पुरावा हा सारखाच असल्याने पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्याकरता सर्व मुद्दे चर्चेकरता एकत्र घेण्यात आले आहेत.

१०. अ.सा.क्र. १ फिर्यादी हयांनी त्यांच्या साक्षी पुराव्यात असे कथन केले आहे की ती आरोपीला ओळखते कारण आरोपी तिचे शेजारी आहेत. घटनेची तारीख तिला आठवत नाही. घटनेच्या दिवशी काहीही घडले नाही. तिने रागाच्या भरात आरोपी विरुध्द शेवगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. अ.सा.क्र.१ हयांना फिर्याद दाखवली. फिर्यादवरील त्यांनी त्यांची सही असल्याचे सांगितले परंतु त्यातील मजकूर माहिती नसल्याचे सांगितले. फिर्यादी साक्षीदार अभियोगपक्षाला समर्थनार्थ साक्ष देत नसल्यामुळे सरकारी वकिलांनी भारतीय पुरावा कायदा कलम १५४ अन्वये त्यांना उत्तरसूचक प्रश्न विचारले. परंतु अभियोगपक्षाला मदत होईल असे काही एक त्यांच्या सरकारी वकिलांनी घेतलेल्या उलटतपासात ग्राहय असणारे सूचक प्रश्न विचारण्यात आले त्यामध्ये देखील अभियोगपक्षाच्या लाभात काहिही आले नाही. सूचक प्रश्नांना उत्तरे देताना अ.सा.क्र. १ ने दि. ०७.०४.२०२४ रोजी सायंकाळी ४.३० वा. ती घराच्या ओटयावर बसलेली असताना आरोपी तेथे आला व तिला पाणी दे असे म्हणाला, ती पाणी देण्यासाठी जात असताना आरोपी तिच्या पाठीमागून आला व तिचा हात धरुन तिला लज्ञा उत्पन्न होईल असे कृत्य करु लागला व म्हणाला की तू मला आवडतेस हे सर्व नाकारले आहे. तसेच अ.सा.क्र.१ हिने पुढे लोक जमा होतील या भितीने आरोपी जाउ लागला व जाताना पुन्हा जर एकटी भेटली तर तुला सोडणार नाही अशी धमकी दिली हे देखील नाकारले आहे. त्यामूळे सदर साक्षीदाराची साक्ष अभियोगपक्षाच्या लाभात विचारात घेता येणार नाही.

११. आरोपीच्या विधीज्ञांनी घटनास्थळ पंचनामा मान्य केला त्यामूळे त्यास नि.क्र. ३१ देण्यात आली. आलेल्या पुराव्याचे विवेचन केले असता अ.सा.क्र.१ फिर्यादी यांचा पुरावा अभियोगपक्षास महत्वपूर्ण होता. फिर्यादी घटनेतील पीडित व्यक्ती आहे परंतु तिने तिच्या पुराव्यात आरोपीने तिचा हात धरला, तिला लज्ञा उत्पन्न होईल असे कृत्य करु लागला व जाताना धमकी दिली असे काही झाले नाही असे सांगितले. त्यामुळे अ.सा.क्र. १ फिर्यादी यांच्या पुराव्यातून आरोपी विरुध्द अभिलेखावर कोणताही पुरावा ओलेला नाही. मूळात फिर्याद शाबित झालेली नाही. त्यामूळे आरोपीने फिर्यादीला लज्ञा उत्पन्न होईल असे कृत्य केले असा कोणताही पुरावा

अभिलेखावर आलेला नाही. आरोपीच्या विधीज्ञांनी जरी घटनास्थळ पंचनामा मान्य केला म्हणून घटना घडली असे म्हणता येणार नाही. अभियोगपक्षाने तपासलेली फिर्यादी साक्षीदार ही घटनेतील पीडिता आहेत परंतु घटनेबाबत तिने कोणत्याच कबूल्या दिल्या नाहीत. त्यामुळे अभियोगपक्षास इतर साक्षीदार तपासून काही उपयोग होणार नसल्याने, इतर साक्षीदार तपासण्यात आले नाहीत. याउलट अ.सा.क्र.१ यांनी आरोपी व तिच्यामध्ये आपसात तडजोड झालेबाबत मान्य केले. त्यामुळेच साक्षीदाराने आरोपीविरुध्द साक्ष दिली नाही असे दिसून येते.

१२. सबब अभियोगपक्षाने आरोपी विरुध्द ठेवलेल दोषारोप संशयापलीकडे शाबित केले नाहीत, त्यामुळे आरोपीस उपरोक्त गुन्हयात गोवण्यासारखा सबळ पुरावा न आल्यामुळे मुद्दा क्र १ व २ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवण्यात येतात व मुद्दा क्र. ३ चे उत्तरादाखल मी पुढील आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. आरोपीची भारतीय दंड संहिता कलम ३५४ व ५०६ च्या आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८ (१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. आरोपीचे जामीनपत्र व बंधपत्र रद्द करण्यात येतात.

३. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७-अ अन्वये अपील न्ययालयात हजर राहण्याविषयी रु. १५,०००/- चे बंधपत्र द्यावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला).

RAMESH RAOJI BHADRE Digitally signed by RAMESH RAOJI BHADRE Date: 2026.08.04 17:20:46 +0530

दि. ०४/०८/२०२६ ( आर. आर. भद्रे )

शेवगाव. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

शेवगाव

**–: प्र मा ण प त्र :–**

मी प्रमाणीत करीते की, सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकुरातील शब्द–न–शब्द मुळ आदेश/न्यायनिर्णयाप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| न्यायालयाचे नांव | – दिवाणी न्यायाधीश क.स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, (न्यायालय क्र.१), शेवगाव, जि. अहमदनगर. |
| लघुलेखकाचे नांव | – श्रीमती उ. भि. थोरात, लघुलेखक श्रेणी – ३ |
| न्यायनिर्णयची तारीख | – ०४/०८/२०२६ |
| न्यायनिर्णयवर पीठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | – ०४/०८/२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | – ०४/०८/२०२६ |